# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 12/01/2024 (शुक्रवार) सकाळ

## कंटेनर वाहनातुन गांजा तस्करी करणारे आरोपी ४९५ किलो ६०० ग्रॅम गांजासह गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिणची कारवाई :—

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिनांक ११/०१/२०२४ रोजी नागपुर उपविभागात अवैध धंद्यांवर आळा घालणे संबंधाने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस ठाणे बुट्टीबोरी हद्दीतून चंद्रपूर ते नागपूर रोडनी एका कंटेनर वाहन क्र. HR 55/S 2346 मधुन अंमली पदार्थ (गांजा) ची वाहतुक होत असल्याची खात्रीपूर्वक माहिती मिळाल्याने मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन बुट्टीबोरी परिसरात चंद्रपूर ते नागपूर रोड येथे नाकाबंदी दरम्यान कंटेनर क्र. HR 55/S 2346 थांबवुन वाहनाची झडती घेतली असता कंटेनर वाहनात **चालक आरोपी नामे— १) शब्बीर जुम्मे खान वय—३० रा, मनपूर करमाला, जोगवा ता. रामगड जी अलवर (राजस्थान)** हा त्याचा सोबती **२) मूनवर आझाद खान वय २८ रा. शहापूर नगली ता नुह जी मेवात (हरियाणा)** याचे मदतीने कंटेनर वाहनामध्ये कॅबिनचे ड्रायव्हर सिटचे मागील भागाने कंटेनरला छुप्या पद्धतीने कप्पा तयार करून त्यामध्ये पांढऱ्या रंगाच्या एकुण १५ बोरीमध्ये गुंगीकारक वनस्पती गांजा बाळगून वाहतूक करतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन १) ४९५ किलो ६०० ग्रॅम किंमती ४९,५६०००/—रू. २) कंटेनर वाहन क्र. HR-55/S- 2346 किंमती २०,००,०००/—रू. ३) दोन मोबाईल संच किंमती २०,०००/— रू. असा एकूण ६९,७६०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून वरील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडुन गाडीचा मालक **३) गाडी मालक हाफिज जुमे खान रा. यमुना नगर (हरियाणा)** असल्याचे व अंमली पदार्थ गांजा मुद्देमाल हा सुनिल नावाचे इसमाचा असुन दोन्ही आरोपीतांना गुन्हयात फरार दाखविण्यात आले आहे. अटक आरोपींतांनी चौकशीमध्ये वरील फरार आरोपींचे सांगण्यावरून विशाखापट्टणम येथुन बिहार कडे घेवुन जात असल्याची माहिती दिली. आरोपीतांविरुद्ध पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम २०, २२ एन. डी. पी. एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त मुद्धेमाल, दोन आरोपी व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले असुन आरोपींचा दिनांक १५/०१/२०२४ पीसीआर घेण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, बट्टूलाल पांडे पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, मिलिंद नांदुरकर, संजय बांते, मयूर ढेकळे, सत्यशील कोठारे, पोलीस नायक अमृत किनगे, रोहन डाखोरे, पोलीस अंमलदार राकेश तालेवार चालक पोलीस अंमलदार आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे, सायबर सेलचे सतिश राठोड, मृणाल राऊत यांचे पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर